# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 09/09/2021 (गुरूवार)

(दुपार)

---

### जबर दुखापत

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 22 कि. मी. मौजा सिंदेवाणी शिवार येथे दिनांक 07/09/2021 चे 20.00 वा. दरम्यान आरोपी नामे– विनोद प्रभाकर मूर्खे, वय 40 वर्ष, रा सिंदेवानी हा मित्रा सोबत दारू पीत असतांना त्याने फिर्यादी नामे– आनंद अभिनाथ डोंगरे वय 30 वर्ष, रा. सिंदेवाणी यांना शिवीगाळ करून जोराने ढकलून दिल्याने फिर्यादी खाली पडल्याने त्यांच्या डाव्या पायाला मार लागला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 325, 504 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रमोद बन्सोड मो.क्र. 9923410223 हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. खापा :– दि. 08/09/2021 चे 12:00 वा. चे सुमारास 22 वर्षीय फिर्यादी/पीडित व आरोपी नामे– पूडंलीक कलंनसिंग परतेकी, वय 60 वर्ष, रा. नवीन वस्ती खापा हे एकमेकांना ओळखतात. फिर्यादी हि आपल्या आईचा घरून स्वःत चा किरायाच्या घरी जात असतांना आरोपी हा रस्त्यात उभा होता व फिर्यादीच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे बोलुन तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 354अ(2) भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी सुचनापत्रावर रिहा असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार विजय बारई हे करीत आहे.

### गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर मौजा ब्राम्हणी शिवार येथे दिनांक 12/08/2020 चे 14.00 वा. दरम्यान आरोपी नामे– 1. संजय भाऊराव चांदुरकर 2. प्रदीप महादेव चनकापुरे 3. अनिल बोडखे 4. जेसीबीचा अनोळखी चालक 5. अनोळखी 03 महीला यांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी नामे– श्रीमती सुरेखा विनायकराव पोकळे वय 71 वर्ष रा. पुष्पांजली इमारत कळमेश्वर यांच्या ताब्यात असलेल्या शेतात गुन्हेगारी अतिक्रमण करून फिर्यादीच्या शेतातील पक्के घर जेसीबीने पाडले. तसेच आरोपीतांनी घरातील कुटार खराब केले त्याबाबत फिर्यादी यांच्या लेखी अर्जावर चौकशी करून चौकशीअंती आरोपीतांनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम 143,427,447 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. मुंडे 9970094709 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर